महाराष्ट्र कॉंग्रेस प्रकाशन

६

१८७५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९८४

# हिंदी स्त्रियांचें जीवन

लेखिका

प्रेमा कंटक

सासवड, पुणें.

REFBK-0006617

किं. ६ आणे. [ १९४५



म. गांधी म्हणतात स्त्रियांनीं प्रतिकार करावा एवढेंच नव्हे तर प्राणत्यागानें प्रतिकार करावा; पण त्यांनीं दुसरी कोठलीहि हिंसा करू नये. स्त्रियांच्या वतीनें मी त्यांना अभिवादन करतें. गांधींच्या या उत्तरानें जगांत सामान्यतः शिकवलेला सिद्धांत, "स्त्रीचाही तिच्या इच्छेविरुद्ध 'अपमान' करतां येतो कारण तिचा 'मान' हा पुरुषाच्या मानापेक्षां निराळा आहे" ह्या राक्षसी कल्पनेचा वध झाला आहे. पण हें खरें नाहीं, कोणाहि स्त्रीचा किंवा पुरुषाचा अपमान दुसऱ्यांकडून केला जात नाहीं. आपणच स्वतःचा अपमान करतों. जगांत मृत्यूपेक्षांहि वाईट गोष्टी आहेत व अपमान ही त्यांपैकीं एक आहे. पण अपमान हा कृत्यांत किंवा इच्छेंत नसतो, तो स्वतःमध्येंच असतो. या दुसऱ्याच्या प्रश्नाचें उत्तर गांधींशिवाय कोण द्यावयास धजला ! सर्व स्त्रियांनीं गांधींचा त्याबद्दल गौरव केला पाहिजे.

मिस् मॉड रॉयडेन
एम्. ए. डी. डी.
( सेव्हन ओक्स केंट, इंग्लंड )

REFBK-0006617

अनुक्रम ९८५८
विभाग
क्रमांक ११४५५
नों. दि.

# हिंदी स्त्रियांचें जीवन

समाजाची रचना इतकी जटिल असते कीं, तींत कोणतेही नवे फेरफार करावयाचे असल्यास सर्वच तंत्र बदलण्याची आवश्यकता भासते. त्यासाठीं समाजांत अमुक प्रमाणांत जागृति, दूरदृष्टि व धैर्य हीं असावीं लागतात. त्यांचा अभाव असेल तर सामाजिक प्रश्नांचा उलगडा होण्याऐवजीं त्यांची अधिकच गुंतागुंत होत जाते. वैचारिक विप्लवकालांत मतामतांचा गलबलाही फार असतो. हल्लींच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि समाजसत्तावादाच्या संघर्षणयुगांत तर प्राचीन आदर्श डळमळूं लागले आहेत, नवमतवाद निर्माण झाला आहे, आर्थिक जीवन सर्वोपरि होऊं लागलें आहे आणि वर्गविग्रह जीवनाचा पाया आहे ही कल्पना लोकप्रिय होऊं लागली आहे. अशा या कालांत मानवी समाजाचा अर्धा भाग अथवा अर्धांग म्हणजे स्त्रीवर्ग त्यासंबंधीं जिव्हाळ्यानें विचार करण्याचा समय प्राप्त झाला आहे; आणि स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांनींच चर्चूं नयेत तर कोणीं चर्चावे ?

हें जग म्हणजे एक प्रयोगशाळा आहे. समाजाची रचना अमुकच प्रकारें व्हावी अगर अमुकच प्रकारें होऊं नये असा हुकूम कोणी काढूं शकत नाहीं. अनेक प्रयोग करीत असतांनाच समाज आपली घडी बसवीत जातो. तरी प्रत्येक रचना निर्दोष असते असेंही नाहीं. जुन्या अडचणी

दूर केल्या तरी नव्या उभ्या राहतातच आणि व्यवस्था नियमबद्ध करण्याचा प्रयत्न केला तर पुष्कळदां नियमबद्धता आंधळी असल्याचाही अनुभव येतो. स्त्रीजीवनाचा प्राचीन कालापासूनचा इतिहाससुद्धां असाच आहे.

मानवसमाज जंगली परिस्थितींतून सुधारत वर येऊं लागला तेव्हां मृगयाकर्मापासून स्त्रियांस मोकळीक देण्यांत आली. त्यांचे शरीरधर्म वेगळे हें जाणून त्यांना गृहस्वामिनींची पदवी देण्यांत आली. तिच्यांतून " न स्त्री स्वातंत्र्यमर्हति " येथवर परिणति होऊन स्त्रियांचें सामाजिक स्वातंत्र्य पार लोपलें.

सम्राज्ञी श्वशुरे भव सम्राज्ञी अधिदेवृषु ।

या शब्दांनीं पतिगृहीं "सम्राज्ञी" म्हणून संबोधिली जाणारी स्त्री पुढें

अतुल्या हि स्त्री पुंसा । यजमानः पुमान् विद्वांश्च । पत्नी स्त्री चाविद्या च । या उक्तीप्रमाणें " अविद्या " ठरली.

स्त्रियांच्या शक्तीच्या उत्कर्षाचा काळ प्राचीन युगांत येऊन गेला आहे, नाहीं असें नाहीं. बालविवाहाची नेणीव, स्वयंवराचें स्वातंत्र्य, स्त्रीधनाचा हक्क, निपुत्रिक विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक, विद्याध्ययनाचा अधिकार, सभास्थानीं चर्चा करण्याची संधि, अविवाहित रहाण्याची सूट इतक्या सवलती असल्यामुळें त्याकाळीं स्त्रियांची बौद्धिक, शारीरिक व मानसिक त्याचप्रमाणें अध्यात्मिक प्रगति इतकी कळसास पोंचली होती कीं तत्कालीन समाज आदर्शाच्या जवळ पोंचला होता आणि तत्कालीन कितीतरी स्त्रियांचीं नांवें आज हिंदुस्थानांत आदर्श महिला म्हणून पिढ्यानुपिढ्या उल्लेखिलीं जात आहेत. सीता व सावित्री, गार्गी आणि मैत्रेयी, ऋग्वेदांत ऋचा गुंफण्याचा मान मिळालेल्या लोपामुद्रा, विश्ववारा व घोषा, सुलभा व वाचक्नवी यांसारख्या पंडिता या सर्वांचीं नांवें प्राचीन साहित्यांत विख्यात आहेत. यज्ञ, राजदरबार, सभासमारंभ व गृहें या सर्व ठिकाणीं स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें व्यवहार करीत. त्यांना कोणत्याही प्रकारें कमी लेखण्यांत येत नसे.

बौद्धकालीन स्त्रियाही स्पृहणीय पद प्राप्त करत्या झाल्या. बुद्धानें त्यांना आपल्या पंथांत प्रवेश दिला होता.तत्कालीन स्त्रियांनाही विदुषी होण्याचा व सभेंत पुरुषांशीं चर्चा करण्याचा अधिकार होता.

दहाव्या शतकानंतर हिंदुस्थानांत परिस्थिति पालटली. मुसलमानांच्या स्वाऱ्या व अधिराज्यें सुरू झाल्यानंतर हिंदुस्थानांतील प्राचीन, राजकीय व सामाजिक घडी पुष्कळशी बिघडून गेली. बालविवाह, पडदा, सती आणि सक्तीचें वैधव्य या गोष्टी हळूहळू रूढ होऊं लागल्या.तथापि मुसलमानांतील उच्चवर्णीय स्त्रियांना बरेंच स्वातंत्र्य होतें. अकबराची आत्या गुलबदन बेगम, पत्नी सलीमा सुलताना, शाहजहान बादशहाची पत्नी मुमताज–इ–महाल, औरंगजेबची भगिनी जहानारा बेगम व कन्या शाहज़ादी ज़ेबुन्निसा या मोठ्या पंडिता व लेखिका आणि कवित्रियी होऊन गेल्या. सुलताना रझिया आणि सुलताना चाँदबिबि या तर राज्यकर्त्या म्हणून ख्यात आहेतच.

रजपूत रमणींना स्वयंवराची व लढाईंत भाग घेण्याची पूर्ण मोकळीक होती. महाराष्ट्राच्या इतिहासांत महाराष्ट्र रमणींचे पराक्रमही सुविख्यात आहेत. रणकुशल, राजकार्यधुरंधर, कवयित्री या नात्यांनीं अनेक महाराष्ट्रीय रमणींचीं नांवें इतिहासांत अजरामर झालीं आहेत.

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । ' असें हिंदु स्मृतिकार कंठरवानें सांगत आहेत. " तुझ्या जननीच्या पायांशीं स्वर्ग आहे, " असें कुरानेशरीफमधील महावाक्य आहे. आदर्श कोठेंही हलका नाहीं. हिंदु, मुसलमान अथवा इतर कोणत्याही मंत्रद्रष्ट्या ऋषीनें स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचें नव्हे तर त्यापेक्षां श्रेष्ठच लेखलें आहे. असें असूनही स्त्रीजातीचें नंतर पतन घडून आलें. आज स्त्रीजात व तिच्या समवेत पुरुष जात दोघेंही निकृष्ट अवस्थेला येऊन पोंचलीं आहेत. या परिस्थितीची थोडक्यांत मीमांसा करून स्त्रीस्वातंत्र्य व स्त्रीगौरवाचा एक नूतन आर्य आदर्श निर्माण करण्याचा किंवा शोधून काढण्याचा प्रयत्न करावयाची इच्छा आहे. स्वस्त प्रतिष्ठा मिळविण्याचा धंदा शिकून स्त्रियांचें

भागणार नाहीं. दोष मूलगामी असले तर उपायही मूलगामीच असले पाहिजेत व ते अमलांत आणण्याचें कार्यही स्त्रियांनाच करावें लागेल.

आज हिंदुस्थानांतील स्त्रियांची स्थिति कशी आहे ? स्त्रिया दलित आहेत, पुरुषांच्या जुलमाखालीं दडपल्या गेल्या आहेत, त्यांना माणसें म्हणून वागवलें जात नाहीं. अशा प्रकारें एकांगी चित्र रंगविण्याची इच्छा नाहीं. प्रत्येक गोष्टीला दोन्ही बाजू असतात. तशांत आज महिला वर्ग प्रबुद्ध होऊन उठला आहे. जगांत वाहणारे शक्तींचे अनेक प्रवाह त्यांनाही अनुकूल प्रतिकूल वाहात आहेत. भोंवतालच्या परिस्थितींतून आपल्या विकासास पोषक काय होईल त्याचा विचार करून आणि आपल्या इच्छा-शक्तीचा व प्रयत्नांचा नेट लावून स्त्रियांनींच स्वतःची उन्नति करून घ्यावयाची आहे.

ही गोष्ट सत्य आहे कीं हिंदुस्थानांत मलबारांतील कांहीं अपवादात्मक भाग सोडला तर स्त्रिया कन्या, पत्नी, माता व विधवा या नात्यानें सर्व-साधारणपणें पुरुषांवर अवलंबून आहेत. वडिलार्जित दौलतीवर स्त्रीचा हक्क नसतो. शिक्षण फार थोड्यांना मिळतें. सुशिक्षित वा अशिक्षित सर्वच स्त्रियांना घरकुलाच्या आवारांतच आयुष्य कंठावें लागतें. संतति तिचें रक्तशोषण करीत असतें. सामाजिक जीवनाची किंवा त्याबाबतच्या आपल्या जबाबदारीची तिला मुळींच जाणीव नसते. अर्थात् घरांत वाव-रतांना पुरुषाच्या छत्राखालीं तिला अमुक मर्यादेपर्यंत पुष्कळ अधिकार असतो. सर्व गृहकृत्यें आणि कौटुंबिक समारंभांत तिचेंच मत प्रमाण असतें. कर्त्या पुरुषाशीं मतभेद नसला तर तिचें स्वामित्व अप्रतिहित घरांत चालूं शकतें. हिंदुस्थानापुरतें असेंही म्हणतां येईल कीं आतांपर्यंत स्त्रियांच्या जीवनविकासासाठीं ज्या ज्या सार्वजनिक चळवळी झाल्या त्या सर्वांस हिंदी पुरुषांनीं मोठ्या प्रमाणांत पाठिंबाच दिला. नव्हे, सुरुवातीस चळवळींचे उत्पादक तेच होते.

सामान्यतः पाहिलें असतां स्त्रीपुरुषांची संख्या समान असली पाहिजे. पण हिंदुस्थानांत तशी ती नाहीं. १९४१ च्या खानेसुमारींत

३८९०००००० लोकसंख्येपैकीं स्त्रियांची संख्या १८८०००००० भरली. म्हणजे एक कोटी तीस लक्षांनीं ती कमी आहे. १९३१ सालीं पुरुष व स्त्रियांचें प्रमाण १००:९४ असें होतें. १९४१ सालीं तें १००:९३·५ झालें. अर्थात् ही सरासरी सांगितली. वेगवेगळ्या प्रांतांत व जमातींत भिन्न भिन्न प्रमाण पडतें. वायव्येकडील प्रदेशांत स्त्रियांचें प्रमाण निकृष्ट आहे. सरहद्दीवर १००:८४·७ आणि पंजाबांतही तेवढेंच. दाक्षिणेंत स्त्रियांचें प्रमाण पुरुषांपेक्षां जास्त आहे. १००:१००·९ म्हणजे स्त्रिया पुरुषांपेक्षां एक टक्क्यानें जास्त आहेत.

सामाजिक दर्जाच्या दृष्टीनें पाहिलें तर उच्चवर्णीयांत स्त्रियांचें प्रमाण लघुतर दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| उच्चवर्णीय | ,, | — १०० : ८७·८ |
| मध्यमवर्णीय | ,, | — १०० : ९३·५ |
| अस्पृश्य | ,, | — १०० : ९३·२ |

धर्मभेदाच्या दृष्टीनें वेगवेगळ्या जमातींचें प्रमाणः—

| | |
|---|---|
| शीख | — १०० : ७८·२ |
| मुसलमान | — १०० : ९०·१ |
| पार्शी | — १०० : ९३·८ |
| जैन | — १०० : ९४·१ |
| हिंदु व ख्रिस्ती | — १०० : ९५·१ |
| बौद्ध | — १०० : १०२·५ |

या आंकड्यांवरून वाचकांनीं आपल्या मनाशीं कारणांचे ठोकताळे बसवावे. स्त्रीजीवनाशीं सामाजिक रहाटीचा किती दाट संबंध आहे हें यावरून दिसून येईल. अर्थात् आर्थिक व इतर कारणेंही पुष्कळ आहेत. त्यांचा आपण साकल्यानें विचार करूं.

हिंदुस्थानांतील विवाहसंस्था ही देखील स्त्रीजीवनावर परिणाम घडवून आणणारी एक सामर्थ्यशाली बाब आहे. साऱ्या जगांत अविवाहित स्त्रियांच्या बाबतींत हिंदुस्थानचा नंबर फार खालीं आहे. १९३१ च्या

खानेसुमारीप्रमाणें हिंदुस्थानात ४९ टक्के स्त्रिया विवाहित, ३५ टक्के अविवाहित व १६ टक्के विधवा असलेल्या आढळून आल्या. अविवाहितांपैकीं ९१ टक्के १५ वर्षें वयाच्या खालच्या होत्या. वयाच्या १५ व ४० च्या दरम्यान अविवाहित स्त्रियांचें प्रमाण फक्त ५ टक्केच होतें, तर त्याच वयाच्या इंग्लंड वेल्समधील अविवाहित स्त्रियांचे प्रमाण ३५ टक्के दिसून आलें. बालविवाहाच्या प्रथेनें हिंदी स्त्रियांचें आयुष्य व संख्या यांचा कसा विध्वंस चालविला आहे ती सर्व कथा अतिशय करुणाजनक आहे.

निसर्गाच्या नियमाप्रमाणें स्त्रींत तितिक्षा शक्ति व रोगांचा प्रतिकार करण्याची शक्ति या जास्त असतात. परंतु या शक्तींचें मूळ जें शरीर तेंच वाढूं देण्याची संधि हिंदी स्त्रियांना मिळत नाहीं. बालविवाह, उत्तर हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर असलेली पडद्याची चाल आणि योग्य त्या वैद्यकीय मदतीचा अभाव यांच्या जोडीस देशाचें वाढतें दारिद्र्य, सर्व मिळून स्त्रीवर्गाचा ऱ्हासच करण्यास सहाय्य करीत आहेत.

हिंदुस्थानांत जन्मास येणाऱ्या मुलांमुलींचें प्रमाण १०८ : १०० असें आहे. पण जगांतील सुधारलेल्या देशांत मुलींपेक्षां मुलांचें मृत्यूचें प्रमाण अधिक असतें. तसेंच वयांत आल्यावर अतिश्रम व धोक्याचीं कामें केल्यामुळें पुरुषांची मृत्युसंख्या इतरत्र स्त्रियांपेक्षां अधिक असते. तर हिंदुस्थानांत सर्वच गणित उलटें आहे. १५ ते ४० या वयांत भरपूर वैद्यकीय मदत प्रसूतिसमयीं न मिळाल्यामुळें मृत्युमुखीं पडणाऱ्या स्त्रियांची संख्या फार मोठी आहे. हिंदुस्थानांत पुरुषांपेक्षां स्त्रियांचें आयुष्य कमी असतें. पुरुषांचें आयुष्य २६·९ वर्षें तर स्त्रियांचें २६·६ वर्षें असतें. इतर राष्ट्रांत हेच आंकडे पुढीलप्रमाणें आहेतः—

न्यूझीलंड—६५·४ : ६७·९, अमेरिका—५९·१ : ६२·६ जर्मनी—५९·९ : ६२·७ इंग्लंड व वेल्स-५८·०७ : ६२·९ जपान—४४·८ : ४६·५

इतर देशांपेक्षां आपल्या देशांत मनुष्याची आयुर्मर्यादा तर कमीच आहे. परंतु स्त्री ही पुरुषापेक्षां ४ महिने कमीच जगते असा हिशोब आहे. वर सांगितलेल्या देशांतून ती पुरुषापेक्षां: दोन तीन वर्षें जास्त जगते.

हिंदुस्थानांत बाळंतिणींची मृत्युसंख्या तर भयावह आहे. १९३३ मध्यें सर जॉन मेगॉ यांचा अंदाज दर हजारीं २४ असा होता. नंतर आरोग्यखात्याच्या मध्यवर्ती समितीनें १९३७ त केलेल्या रिपोर्टाप्रमाणें तें प्रमाण हजारीं २० असें ठरलें. सर जॉन म्हणतात कीं दर वर्षी दोन लाख बाळंतिणी मरत असाव्यात अथवा तासीं २० मृत्यु होत असावेत. मृत्युमुखीं पडणाऱ्या या बाळंतिणींपैकीं मोठी संख्या १४ ते २० वर्षांच्या आंतील मुलींची आहे आणि दर हजार तरुण मातांपैकीं शंभर तरी बाळंतपणांतच कालवश होतात. इंग्लंडमध्यें बाळंतिणींच्या मृत्यूचें प्रमाण दर हजारीं फक्त २·७६ एवढेंच आहे !

दर वर्षी हिंदुस्थानांत हिंवताप,क्षयरोग,पटकी, प्लेग व देवी यांना सांठ लाख स्त्रिया बळी पडतात.याशिवाय बाळंतपणांत लागलेले स्त्रियांचे इतरही खास आजार असतातच. बालविवाह आणि अकालीं मातृपद मिळणें यामुळें विशेषेंकरून उत्तरेकडील स्त्रियांत हाडें दुर्बळ करून टाकणाऱ्या आजाराचा प्रादुर्भाव होतो. १५ वर्षांखालील वयाच्या २५००००० मुली विवाहबद्ध होतात आणि शारीरिक दृष्ट्या मातृपदाची लायकी येण्यापूर्वीच मुलींना मुलें होतात. त्यामुळें त्यांना लौकरच पंडुरोग लागूं पडतो. या दुष्ट चालीच्या जोडीला उत्तरेकडे पडद्याची चालही आहेच. हिंदुस्थानांत सुमारें चार कोट स्त्रिया पडद्याच्या चालीला बळी पडल्या आहेत. आणि या पडदानशीन स्त्रियांतच विशेषेंकरून क्षयरोगाचें जाळें पसरत आहे. त्याचा आंकडा फारच भयंकर आहे.१०ते १४ वर्षें वयाच्या पडदानशीन मुलींत ४४·४६ टक्के व हिंदूंत १८·८१ टक्के असें क्षयरोगाचें प्रमाण आहे. प्रसूतिकालांत हेच आंकडे फुगत जातात !

हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या आयुमर्यादेची, रोगांची, आरोग्याची चर्चा येथवर केली.अशा परिस्थितींत स्त्रियांना वैद्यकीय मदतीची किती आवश्यकता आहे हें सांगणें नकोच. आपण हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, बहुजनसमाज हिंदुस्थानांतील सात लाख खेड्यांतून वसला आहे. युद्धापूर्वी अडीच लाखांपासून पंधरा लाख वस्तीचीं सुमारें अकराच शहरें

हिंदुस्थानांत होतीं.यावरून हिंदुस्थानांतील वस्तीची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील लोकसंख्या गेल्या खानेसुमारींत ३८ ते ३९ कोटींच्या दरम्यान होती. पैकीं एक तृतीयांश संस्थानी प्रजा समजा. अशा या अफाट वस्तीच्या देशांत ब्रिटिश हिंदुस्थानांत हॉस्पिटलें व दवाखाने मिळून केवळ ७००० आहेत. शहरवस्तींत दर १३०००माणसांस एक हॉस्टिपल किंवा दवाखाना आणि खेड्यांतील वस्तींत दर ५३००० माणसांस तेंच प्रमाण लागू पडतें !खास स्त्रियांसाठीं इस्पितळें फारच थोडीं आहेत.जीं थोडीं आहेत तीं मोठ्या शहरांत व क्वचित् जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणीं दिसून येतात. अशीं इस्पितळें एकंदर २२६ असून संयुक्त प्रांतांत ८२, पंजाबांत ४०,मद्रास इलाख्यांत ४२, मध्यप्रांत व वऱ्हाड यांत १२, बंगाल १८, मुंबई १४, सिंध ८, बिहार ५, सरहद्दीवरील प्रांत ४ व आसाम १ अशीं आहेत. यांपैकीं पुष्कळशीं संस्थांनीं चालविलीं आहेत. सरकार त्या बाबतींत पूर्ण उदासीन आहे.

स्त्री डॉक्टरांची संख्याही फारच कमी आहे. स्त्रियांच्या मेडिकल सर्व्हिसमध्यें पुरत्या ४० स्त्रियाही नाहींत आणि धंदा करणाऱ्या स्त्रीडॉक्टर सुमारें ३००० असतील.यांतील अर्ध्याहून कमी पदवीधर आहेत.यांपैकीं पुष्कळजणी लग्न करून गृहकृत्यांत गुरफटून जातात. हिंदुस्थानांत आरोग्य–केन्द्रें (welfare centres) आणि आरोग्यतपासनीस (Health visitors) फारच अल्प आहेत. १९३८ च्या अखेरीस ४ कोट १० लक्ष जनसंख्येच्या इंग्लंड देशांत ३२६१ आरोग्य–केन्द्रें होतीं आणि सर्व वेळ सेवेंत घालवणाऱ्या आरोग्यतपासनीसांची संख्या २८७७ होती. हिंदुस्थानची लोकसंख्या इंग्लंडच्या दसपट असून १९३९ त फक्त १०२० केन्द्रेंच होतीं. शिकलेल्या ( रजिस्टर झालेल्या ) सुइणी हिंदुस्थानांत ६१३५ एवढ्याच आहेत. अखिल हिंदुस्थानांत बाळंतिणी व मुलें यांच्या सेवेस लागलेल्या स्त्रीडॉक्टर सुमारें ७५ किंवा ८० असतील ! यांपैकीं फक्त निम्म्यांनाच त्या विषयाचें खास शिक्षण मिळालें आहे ! !

स्त्रियांना गर्भारपणीं, प्रसूतिसमयीं व प्रसूतीनंतरच्या पहिल्या दहा

दिवसांत वैद्यकीय सल्लामसलत, औषधोपचार आणि इतर मदत यांची अत्यावश्यकता असतांना देखील यांपैकीं कांहींच मिळूं शकत नाहीं. शहरांत किंवा जिल्ह्यांतील मुख्य ठाण्यांत वस्ती करून असणाऱ्या स्त्रियांना यांपैकीं थोड्याफार सवलती मिळूं शकतात. पण पुष्कळदां अज्ञान आणि दारिद्य यांमुळें स्त्रियांना ही अपुरती मदतसुद्धां घेतां येत नाहीं, असेंही घडतें. खेड्यांत तर परिस्थिति अवर्णनीय असते. अडाणी दायांच्या हातीं पडलेल्या गरीब, अज्ञान बाळंतिणींचे हाल वर्णन करून सांगतां येण्यासारखे नाहींत !

सर्वसाधारण स्त्रियांच्या आरोग्याचें हें वर्णन झालें. विद्यार्थिनी व मजूर स्त्रिया यांच्याबद्दलही थोडें खास विवेचन केलें पाहिजे. विवाहपूर्व वय म्हणजे ब्रह्मचारी जीवन ! मानवी आयुष्यांतील तो वसंतऋतुच असतो. साऱ्या वर्षाची मदार वसंतऋतूंतील आरोग्यसंवर्धनावर अवलंबून असते. पण आमच्या शाळाकॉलेजांतून शिकणाऱ्या मुलींच्या आरोग्याचा विचार फारसा स्पृहणीय नाहीं. सरकारकडून त्या बाबतींत अनास्थाच्च आहे.सोव्हिएट रशियामध्यें मुलांचा सांभाळ व त्यांच्या आरोग्याची व शिक्षणाची देखरेख करण्यासाठीं एक खास खातें उघडण्यांत आलें आहे. मुलांवर सरकारचें पूर्ण लक्ष असतें. पण हिंदुस्थानांत सरकार विद्यार्थिवर्गाची तितकीच आबाळ करतें. विद्यार्थ्यांनीं राजकीय आंदोलनांत भाग घेऊं नये एवढी खबरदारी मात्र हिंदुस्थानचें परकीय सरकार कसोशीनें घेतें. परंतु त्यांना सुदृढ व आरोग्यवान् नागरिक बनविण्याची जबाबदारी आपणांवर आहे असें त्यास मुळींच वाटत नाहीं. मुलांच्या बाबतींत कांहीं अंशानें सरकार आरोग्याची पहाणी करतें. मुलींच्या बाबतींत मात्र तेवढें सुद्धां लक्ष देण्यांत येत नाहीं. दिल्लींत कायती थोडी फार व्यवस्था आहे. संयुक्त प्रांतांत मुलांची सोय झाली आहे, मुलींची नाहीं. पंजाब व बिहारमध्यें आरोग्य तपासलें जातें—पण फक्त मुलांचें. मद्रासनें ही तपासणी शाळांतून सक्तीची केली होती पण द्रव्याभावीं ती योजना गाळण्यांत आली.

कारखान्यांतून २५२००० मजूर स्त्रिया कामें करितात. परंतु प्रथमोपचारांखेरीज इतर वैद्यकीय मदत त्यांना मिळण्याची सोय नाहीं. बाळंतपणाच्या नांवानें त्यांना कांहीं सवलती मिळतात, परंतु प्रांतपरत्वें धोरणांत फेर आहे. मजुरांसाठीं हवाशीर व आरोग्यवर्धक घरें बांधण्याची जबाबदारी कोणत्याही मालकावर किंवा सरकारवर नाहीं. पुष्कळसे मजूर एका खोलींत कुटुंबेंच्या कुटुंबें घेऊन राहातात. गृहसौख्य, नैतिक उन्नति व आरोग्य यांची त्यांना ओळखही नसतें. कारखान्यांच्या मालकांना किंवा नगरपालिकांना त्यांच्या मजुरांच्या जीवनराहाटीची पर्वा नसते. शहरांतील मजूरवस्तींत बाळंतिणी व बाळें यांची मृत्युसंख्या फार मोठी आहे.

इंग्रजी अंमल हिंदुस्थानांत सुरू झाल्यास दोनशें वर्षे होत आलीं. हिंदी लोकांना निःशस्त्र केल्यावर, हिंदुस्थानांतील सर्व कारखाने व ग्रामोद्योग मारून टाकल्यावर बहुजनसमाजाच्या हातीं इंग्रजांनीं नांगर दिला व थोड्याफार साक्षर लोकांस सरकारी नोकर बनविलें. गव्हर्नर जनरल बेंटिंगच्या कारकीर्दींत लॉर्ड मेकॉले यांनीं भगीरथ प्रयत्न करून हिंदुस्थानांत इंग्रजी शिक्षणाचें माध्यम स्वीकारण्यास सरकारवर वजन आणलें. देशांत इंग्रजी शिक्षणास सुरुवात झाली. पुरुषार्थाचीं सर्व क्षेत्रें बंद झाल्यावर अर्थात् विद्यामंदिरें हें एकच क्षेत्र बुद्धिमान् लोकांस पसंत करावें लागलें. पण तेथेंही त्यांच्या बौद्धिक प्रगतीची वाढ खुंटविण्याची सोय सरकारनें करून ठेवली होती हें लोकांच्या फार उशीरां लक्षांत आलें. "या जीवनविघातक चाकोरींतून साराच समाज किंवा बहुजनसमाज गेला नाहीं. फक्त ८ टक्केच लोक देशांत साक्षर आहेत ही ईश्वरी कृपाच मी समजतों," असे उद्गार श्री. विनोबा भावे यांनीं वर्धा येथील पहिल्या मूलोद्योगी शिक्षणपरिषदेंत काढले होते. हें मत ग्राह्य असो वा अग्राह्य असो. देशांत शिक्षणाचा विशेषतः प्राथमिक शिक्षणाचा प्रचार ८ टक्क्यांपलीकडे झाला नाहीं ही गोष्ट हिंदुस्थानांतील सुधारलेल्या म्हणविणाऱ्या इंग्रजसरकारास काळिमा लावणारी आहे. नव्वद वर्षांपूर्वीं वूड कमिटीनें स्त्रीशिक्षणाचा प्रचार करण्याबद्दल फार जोराची

शिफारस केली होती. तरी १९४१ त साक्षर स्त्रियांचें प्रमाण शेंकडा २ एवढेंच दिसून आलें !

१९३१ ते १९४१ च्या दशकांत हिंदुस्थानांतील साक्षरतेचें प्रमाण ८ टक्क्यावरून १२ टक्क्यांवर गेलें आणि पुरुषांचें साक्षरतेचें प्रमाण १४ टक्क्यांवरून २२ वर गेलें ! पण स्त्रियांचें प्रमाण २ टक्केच राहिलें ! ! त्रावणकोरमध्यें स्त्रिया ३६ टक्के साक्षर आहेत, पण कोचीन संस्थानांत २६·५ टक्के साक्षर आहेत. मुंबई प्रांतांत त्यांचें प्रमाण ९ टक्के असून बंगालमध्यें ७ आहे. हें यशसुद्धां दरम्यानच्या काँग्रेस मंत्रिमंडळांनीं मिळविलें !

हिंदु व मुसलमान जमातींतील सामाजिक रूढी स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराला आड येतात हें खरें आहे. बालविवाह व अकालीं मातृपद यांमुळें मुलींच्या बौद्धिक विकासालाही अनुकूल वातावरण मिळूं शकत नाहीं. पदर आल्यावर मुलींना शिक्षणसंस्थांत पाठवण्याचें बंद करण्याची प्रथाही त्यांच्या शालेय शिक्षणाच्या आड येते. बहुजनसंख्याक स्त्रिया शेतकरी व मजूर जमातींतील असल्यामुळें त्यांच्या पेशाला शिक्षणाचें वावडेंच असतें.

धर्मभेदाप्रमाणें साक्षरतेच्या प्रमाणाचे पुढील आंकडे उद्‌बोधक वाटतील:—

| जमात | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| पारशी | ८४·५ | ७३·४ |
| ज्यू | ४८·८ | २३·८ |
| ख्रिस्ती | ३५·२ | २८·३ |
| जैन | ५८·२ | १०·६ |
| शीख | १३·८ | २·९ |
| हिंदु | १४·४ | २·१ |
| मुसलमान | १०·७ | १·५ |

ही १९३१ ची खानेसुमारी आहे. शिक्षणखातें मुलांच्या व मुलींच्या

शिक्षणाच्या बाबतींत विषम दृष्टि ठेवीत असतें. प्राथमिक शिक्षण तर स्थानिक संस्थांच्या हातीं आहे. परंतु या संस्था शिक्षणाकडे मौलिक दृष्टीनें पहात नाहींत. राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीनें शिक्षणाचा विचारही करीत नाहींत. त्यामुळें पैसे खर्चून परिणाम निकृष्ट येतो. म्हैसूर संस्थानांत प्राथमिक शिक्षणखातें सरकारनें आपल्या हातीं घेतलें आहे.

वस्तुतः पाहतां प्राथमिक शिक्षण हें सर्व शिक्षणाचा पाया आहे. त्याकडे शिक्षणखात्यानें आपलें पूर्ण लक्ष दिलें पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण-संस्कारसुद्धां प्राथमिक शिक्षणांतूनच दिले पाहिजेत. परंतु हिंदुस्थानांत सर्वच उलटें आहे. पायाच मुळीं कच्चा आहे. त्यांत मुलींच्या शिक्षणाची तर आबाळच असून तें सदोष व हीन दर्जाचें आहे. प्राथमिक शाळांत शिक्षण घेणारीं मुलें ८६ लाख आहेत तर मुली २८ लाख आहेत ! पुन्हां दर शंभरी २६ मुलें पहिलीपासून चौथीपर्यंत पोंचतात तर मुली फक्त १३ च पोहोंचूं शकतात ! साऱ्या प्रांतांतून मुलांच्या प्राथमिक शाळा १६१००० आहेत तर मुलींच्या फक्त २६००० आहेत. यांपैकीं पुन्हां ६० टक्के मुलींच्या शाळांतून व ४६ टक्के मुलांच्या शाळांतून एकएकच शिक्षिका अथवा शिक्षक आहे. मुलींच्या शाळांतील ४२ टक्के शिक्षिका ट्रेनिंग घेतलेल्या नाहींत. मुलींच्या शाळांवर १·५ कोटी खर्च होतो, तर मुलांच्या शाळांवर ७ कोटी होतो.

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असलें पाहिजे. गेल्या २५ वर्षांत रशिया व तुर्कस्थान या राष्ट्रांनीं शिक्षणाचे क्षेत्रांत, विशेषेंकरून स्त्री-शिक्षणाचा प्रचार करण्यांत विलक्षण प्रगति करून दाखविली आहे. परंतु हतभागी हिंदुस्थानची कहाणी करुण आहे. त्रावणकोर व कोचीनसारख्या प्रगतिपर संस्थानांत देखील सक्तीचें शिक्षण नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांत कित्येक प्रांतांतून फक्त २३ केंन्द्रांतून मुलींचें प्राथमिक शिक्षण सक्तीचें आहे. मद्रासेंत शहरांतून ७ ठिकाणीं व खेड्यांतून २ ठिकाणीं, त्याचप्रमाणें मुंबईत १२ पैकीं ७ ठिकाणीं मुलींचें शिक्षण सक्तीचें आहे. संयुक्त प्रांतांत ३९३ केन्द्रांत मुलांना सक्तीचें शिक्षण देण्यांत येतें, तर मुलींना फक्त ६ च केन्द्रांतून प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें आहे.

आतां दुय्यम शिक्षणाबाबत पाहिलें तर असें दिसून येईल कीं, सरकार या बाबींत तर अधिकच उदासीन आहे. दुय्यम शिक्षणाच्या संस्था सरकारी अशा फार थोड्या आहेत. पुष्कळशा खाजगी व्यक्तींच्या किंवा संस्थांच्या हातीं आहेत. विशेषेंकरून मुलींच्या शाळा. मिश-नऱ्यांनीं प्रथम या क्षेत्रांत पदार्पण केलें. अजूनही दुय्यम शिक्षणाच्या पुष्कळ संस्था त्यांच्या हातीं आहेत. त्यांच्याखेरीज इतरही अनेक जातीय व खासगी संघटना अस्तित्वांत आल्या. परिणाम असा झाला आहे कीं, शिक्षणक्रमांत कोठेंही एकसूत्रता किंवा साम्य नाहीं. सरकार आर्थिक मदत देतें व मधूनमधून आपले तपासनीस शाळांची तपासणी करण्यास पाठवतें. मुलांमुलींचें आरोग्य व चारित्र्य यांची वाढ करण्याची कांहींच योजना सरकारतर्फे केली जात नाहीं. त्यामुळें मुलें बरीचशीं जातीय संघटनांच्या आहारीं जात आहेत. परकीय सरकारास हिंदी विद्यार्थि-वर्गाला राष्ट्रीयतेचें संस्कार दिलेले आवडत नाहींत. त्यापेक्षां विद्यार्थिवर्ग संकुचित जातीय पक्षाभिनिवेशानें भारलेला त्याला विशेष पसंत पडेल. परंतु या गोष्टीमुळें राष्ट्राचें अतिशय नुकसान होत आहे. देशांत हल्लीं दुय्यम शिक्षणाच्या मुलांच्या शाळा १२००० असून मुलींच्या १३०० आहेत. या १३०० पैकीं फक्त २०० सरकारी शाळा आहेत. कांहीं थोड्या स्थानिक संस्थांच्या हातीं आहेत. ८० टक्क्यांपेक्षां अधिक सर-कारी मदत घेतात व पुष्कळांत जातीय पक्षाभिमानही चढता आहे.

उच्च शिक्षण घेण्यासाठीं मुलींना मुलांच्या कॉलेजांत प्रवेश मिळतो. एकंदर ३२५ कॉलेजांपैकीं ४५ कॉलेजें फक्त स्त्रियांसाठीं आहेत. परंतु स्त्रियांच्या कॉलेजांतून अध्यापक वर्ग व सरंजाम कमी प्रतीचे असल्यामुळें पुष्कळ मुलींना मुलांच्या कॉलेजांत जाणें अधिक बरें वाटतें. ब्रिटिश हिंदुस्थां-नांत १५००० स्त्रिया युनिव्हर्सिटीचें शिक्षण घेत असतात व दिवसेंदिवस ही संख्या वाढतीच आहे. पैकीं ७८८ विद्यार्थिनी वैद्यकीय कॉलेजांत असून १२० कायद्याच्या टर्म्स भरतात. मद्रासकडे एक विद्यार्थिनी एंजिनियरिंग कॉलेजांत प्रविष्ट झाली आहे.

प्रौढ स्त्रियांत साक्षरता–प्रचार करण्याचें काम तर सरकार स्वतःचें समजतच नाहीं. खासगी व्यक्तींच्या किंवा संस्थांच्या थोड्याफार प्रयत्नांनीं तें चालतें. काँग्रेस मंत्रिमंडळ असतांना या दिशेनें चालना देण्याचा फार मोठा प्रयत्न करण्यांत आला होता. पण काँग्रेस मंत्रिमंडळें राजीनामा देऊन निघून घेल्यावर तो प्रयत्नही संपुष्टांत आला. कोठें कोठें रात्रींच्या शाळा चालू आहेत पण स्त्रियांना रात्रींची वेळ अनुकूल नसते. मुंबई व बिहार प्रांतांतून स्त्रियांत साक्षरताप्रचार करण्याचे प्रयत्न झाले होते. पण प्रौढ–शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. इतर देशांत प्रौढ शिक्षण म्हणजे वयांत आलेल्या श्रमजीवी लोकांस प्राथमिक शिक्षणानंतर दिलेलें शिक्षण होय. तें घेण्याची संधि त्यांना मिळत नाहीं म्हणून व्याख्यानें, प्रवचनें, मॅजिक लॅन्टर्न इत्यादि साधनांच्या द्वारां तें सामान्य लोकांस देण्याची व्यवस्था केली जाते. अशी सोय या देशांत नाहीं.

हिंदुस्थानांत प्राथमिक व उच्च शिक्षणसंस्थांतून मुलें व मुली एकत्र शिक्षण घेत असतात. कांहीं कांहीं प्रदेशांतून मुलींच्या शाळा अजीबात नसल्यामुळें मुली मुलांच्या शाळांत प्रविष्ट होतात. ६० टक्के मुली मुलांच्या शाळांत जातात व जसजसें दक्षिणेकडे जावें तसतसें ही प्रथा व्यापक प्रमाणावर दिसून येते. उच्च शिक्षणाच्या बाबतींत तर मुली मुद्दामच मुलांच्या कालेजांत जातात. धंदेशिक्षणाच्या संस्था स्त्रियांसाठीं वैद्यकाशिवाय इतर नाहींतच. १८७५ त मद्रासकडे पाहिल्या प्रथम स्त्रियांना वैद्यकीय कॉलेजांत प्रवेश मिळाला व १८८३ त मुंबईत मिळाला. त्या दृष्टीनें इंग्लंडपेक्षां हिंदुस्थानांतील लोकमत उदार आहे असें म्हणतां येईल. इंग्लंडमध्यें जुन्या काळीं स्त्रियांसाठीं वेगळीं विद्यापीठें असत. हिंदुस्थानांत प्रो. कर्वे यांनीं स्थापिलेलें स्त्रियांचें पहिलें विद्यापीठ निघालें त्याला कारण इतर विद्यापीठांतून विद्यादानाचें माध्यम इंग्रजी होतें हें होय. परकीय भाषा हें पुरुषांपेक्षांही स्त्रियांना अधिक घातक माध्यम आहे. सरकारी विद्यापीठांतून विद्यार्थिनींना त्यांच्या जीवनाच्या दृष्टीनें

प्रस्तुतचा शिक्षणक्रम किती अपूर्ण व सदोष वाटतो त्याचें आणखी एक उदाहरण म्हणजे दिल्लींत अखिल भारतीय महिला परिषदेच्या विद्यमानें गृहशास्त्र शिकविण्यासाठीं लेडी अर्विन कॉलेजची स्थापना झाली हें होय. परंतु तेथें माध्यम मात्र इंग्रजीच ठेवला आहे! अलाहाबाद व इतरत्र अशा संस्थांची वाढती मागणी आहे. तरीसुद्धां पुष्कळ सुशिक्षित स्त्रिया पुरुषांना देण्यांत येणारेंच शिक्षण स्त्रियांसही देण्यांत यावें असें म्हणतात.

आतां श्रमजीवी स्त्रियांची थोडी माहिती देऊं. १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें हिंदुस्थानांत २५ टक्के स्त्रिया श्रम करून पोट भरणाऱ्या आहेत. हिंदुस्थानांत चार कोटी स्त्रिया पडद्यांत आहेत तरीसुद्धां पाश्चिमेकडील श्रमजीवी स्त्रियांच्या आंकड्यांच्या प्रमाणांत व हिंदी प्रमाणांत फारशी तफावत नाहीं. मात्र हिंदुस्थानांतील बहुतेक श्रमजीवी स्त्रिया अंगमेहनतीच्या कामांतच गुंतलेल्या असतात. वरच्या धंद्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या फारच थोडी आहे. १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें १५ कोटी ४० लक्ष मजूरांपैकीं चार कोटी नव्वद लक्ष स्त्रिया होत्या, म्हणजे स्त्रियांचें प्रमाण पुरुषांशीं ३२:६८ ठरलें.

मजूर स्त्रिया मोठ्या संख्येनें शेतांत आणि घरोघरीं मोलमजूरीचीं कामें करण्यांत गुंतलेल्या आहेत. फार थोड्या कारखान्यांतून कामें करितात. शेतांतील कामांत त्यांची संख्या ३३ टक्क्यांनीं आहे आणि घरगुती नोकरवर्गांत ८२ टक्के स्त्रिया असतात. शेतावर काम करणाऱ्या दर शंभर मजुरांत स्त्रियांचें प्रमाण ४६ टक्के आहे. खेड्यांतील सर्व धंद्यांत त्या बहुतेक पुरुषांच्या बरोबरीनें कामांचा वांटा उचलतात. मळ्यांतूनसुद्धां स्त्रियांचें प्रमाण शेतांप्रमाणेंच आहे.

जवळ जवळ ८५ टक्के लोक खेड्यांत राहात असल्यामुळें व खेड्यांकडे सरकार व समाज यांचें सारखेंच दुर्लक्ष असल्यामुळें खेड्यांतील या श्रमजीवी स्त्रियांना शिक्षण किंवा कलाकौशल्याच्या धंद्याचें शिक्षण मिळूं शकत नाहीं. शहरांतील कोठल्याही सोयीपासून त्या वंचित असतात. परंतु हेंही तितकेंच खरें आहे कीं, शहरांतील आपल्या भगिनींपेक्षां त्यांना

अधिक मोकळें जीवन उपभोगण्यास मिळतें आणि शहरांतील पांढरपेशा स्त्रियांस भोगाव्या लागणाऱ्या सामाजिक अडचणी त्यांना कमी प्रमाणांत भोगाव्या लागतात किंवा जवळजवळ भोगाव्या लागतही नाहींत म्हटलें तरी चालेल.

हिंदुस्थानांतील ज्या ज्या कारखान्यांस इंडियन फॅक्टरी ॲक्ट लागू पडला आहे त्यांतून १ कोटी ८० लक्ष मजूर राबत असतात. पैकीं २४३०० स्त्रिया आहेत. स्त्रियांना सर्वसाधारणपणें पुरुषांपेक्षां कमी मजूरी मिळते. कोठल्याही क्षेत्रांत व कोठल्याही दर्जावरून तिनें काम केलें तरी मजूरी पुरुषांपेक्षां कमीच असते. पण सवलतीसुद्धां त्यांना तेवढ्याच मिळतात. १९११ पासून मजूर स्त्रियांसाठीं सरकारनें कांहीं खास कायदे केले. त्यांना धोक्याच्या कामांवर घ्यावयाचें नाहीं, सायंकाळीं ७ ते पहांटे ५ पर्यंत कामास जुंपावयाचें नाहीं, आरोग्यविघातक कामांतून वगळावयाचें इत्यादि कायदे केल्यावर १९३४ मध्यें त्यांच्या कामाचे १० तास करण्यांत आले. वेगवेगळ्या प्रांतांतून मजूर स्त्रियांच्या बाळंतपणाची सोय करणारे कायदे पसार करण्यांत आले. या काळांत दररोज त्यांना ८ आणे भत्ता मिळतो व प्रसूतीपूर्वीं चार आठवडे व नंतर चार आठवडे याप्रमाणें रजा मिळते. आरोग्यकेन्द्रें, शिशुगृहें वगैरे सवलती मजूर स्त्रियांना फारच सावकाशीनें देण्यांत येत आहेत.

पूर्वीं भूमिगत खाणींतून काम करणाऱ्या मजुरांत ३० टक्के स्त्रिया असत. १९२८ सालीं स्त्रियांना त्या क्षेत्राची बंदी करणारा कायदा पसार झाला. तो पूर्ण अमलांत येईपर्यंत १९३६ साल उजाडलें. पण लगेच १९४३ त सरकारनें युद्धकालीन दगडी कोळशांची तंगी मिटविण्यासाठीं वरील बंदी उठवून टाकली ! या घटनेविरुद्ध हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही देशांत पुष्कळ ओरड झाली पण सरकार अजून बहिरेंच होऊन बसलें आहे.

खेड्यांतील पुष्कळसे धंदे स्त्रिया करितात. कुंभारकाम, गूळ तयार करणें, कांडण, दळण, खेळणीं, वगैरे अनेक धंदे त्या करतात. दुकानें

चालवतात, बांगड्या भरतात, भाजी फळें विकतात, सुशिक्षितांच्या कार्य-क्षेत्रांत मात्र त्यांना तितकी मोकळीक नाहीं. जवळ पैसे असल्यास स्वतंत्र धंदे करण्यास स्त्रियांस समाजांत मना नाहीं पण नोकऱ्यांत मात्र त्यांना प्रवेश सुलभ नाहीं. सरकारनें नियम करून दिवाणी, वैद्यकीय, जंगल, पोलीस, हिशोबतपासणी व हिशोब खातीं तसेंच रेल्वे व विमान खातीं यांत स्त्रियांना मज्जाव केला आहे. महायुद्धानंतर स्त्रियांना इंडियन मेडि-कल सर्विसचें द्वार मोकळें झालें. स्त्रिया ऑनररी मॅजिस्ट्रेट होऊं शकतात व ज्यूरींत बसूं शकतात ( फक्त मुंबईत ). रेल्वेंतही हल्लीं त्यांस हलक्या नोकऱ्या देऊं लागले आहेत. बहुतेक पांढरपेशा स्त्रिया शिक्षिका, नर्सिस, मिड्वाइव्ज्, कंपाऊंडर व आरोग्यतपासनीस हे धंदे पत्करितात. फार क्वचित् स्त्रिया वकिलीचा धंदा करितात. पुष्कळशा सुशिक्षित स्त्रिया धंदे-शिक्षण घेतल्यावर देखील विवाहबद्ध झाल्या म्हणजे संसारकृत्यांतच मग्न होतात. मग त्यांच्या सर्व शिक्षणावर पाणी पडतें. या पेशांतूनसुद्धां पुरुष व स्त्रिया यांच्या वेतनांतून विषमता आढळून येते. १९३१च्या खानेसुमारी-प्रमाणें पांढरपेशा धंद्यांत काम करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण एकूण नोकरांच्या १३ टक्के होतें; दुसरी सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे कारखान्यांतील स्त्रियां-प्रमाणें या धंद्यांतील स्त्रियांची संघटना बिलकुल नाहीं. सुशिक्षित असल्या तरी स्त्रियांच्या प्रश्नांकडे त्या उदासीनतेनें पाहातात. त्यांच्या दृष्टींत अजून अवश्य तें परिवर्तन झालें नाहीं.

साहित्य व ललितकलांत स्त्रिया बऱ्याच चमकूं लागल्या आहेत. श्री. तोरु दत्त व श्री. सौ. सरोजिनी नायडू या तर आंतरराष्ट्रीय ख्याति पावलेल्या हिंदी कवयित्री आहेत. अमृत शेरगिल ही आंतरराष्ट्रीय ख्याति मिळविलेली चित्रकार होती. तिच्या व श्री. तोरु दत्त यांच्या मृत्यूनें देशाचें नुकसान झालें. मेनका ही नृत्यकुशल स्त्री आंतरराष्ट्रीय ख्याति मिळवून आली आहे. रुक्मिणीदेवी आरुंडेल, देविकाराणी, साधना बोस वगैरे स्त्रिया नृत्यकलेंत प्रसिद्धी पावल्या आहेत. चित्रकला, शिल्पकला, संगीत, वादन, लेखन इत्यादि कलांतही स्त्रिया आपलें नैपुण्य व वैशिष्ट्य दाखवीत आहेत. नाट्यकलाही त्यांनीं सोडली नाहीं.

परंतु स्त्रियांनीं फार मोठा पराक्रम करून दाखविला तो राजकारणांत. हिंदुस्थानांतील उदारमतवादी प्रागतिकांच्या प्रेरणेनें त्या हळूहळू सामाजिक कार्यांत पडूं लागल्याच होत्या. महात्मा गांधींनीं स्त्रियांस राजकारणांत प्रवेश करण्यास स्फूर्ति व प्रोत्साहन दिलें. श्रीमती ॲनी बेझंट व श्री. सरोजिनी नायडू या तर हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानींही विराजमान झाल्या होत्या. वर्किंग कमिटीची एक सभासद स्त्री आहे. राजकीय आंदोलनें जेव्हां जेव्हां सुरू होतात तेव्हां तेव्हां हिंदी स्त्रिया जातिधर्मविरहित वृत्तीनें मोठ्या धडाडीनें स्वराज्य–संग्रामांत उडी घेतात व पुरुषांच्या बरोबरीनें कायदेभंग करून तुरुंगवास सोसतात. म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड व कायदेमंडळें यांतूनही स्त्रिया निवडून येत असतात व कॉंग्रेस मंत्रिमंडळें असतांना एक स्त्री–श्री. विजयालक्ष्मी पंडित या प्रधानमंडळांत होत्या व इतर कित्येक स्त्रियांनीं डेप्युटी स्पीकर व पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणूनही कामें केलीं आहेत. इतक्या अल्प प्रमाणांत स्त्रियांत साक्षरता असतांना आणि आरोग्याच्या व सामाजिक सोयींच्या दृष्टीनें हिंदी स्त्रियांना फारच कमी अनुकूलता असतांनाही त्यांनीं आपल्या अंगचीं विजातीय शौर्य, धाडस, बुद्धिमत्ता, सामर्थ्य व त्याग हीं इतक्या मोठ्या प्रमाणांत व संख्येंत दाखविलीं आहेत कीं जगांत त्यांना दुसरी तोड नाहीं !

आतां स्त्रियांकडे पाहाण्याची कायद्याची दृष्टि थोडी चर्चून नंतर परिस्थितीवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करूं. हिंदुस्थानांत हिंदु, मुसलमान, पार्शी वगैरे अनेक जमाती असल्यामुळें सर्व स्त्रियांसाठीं सारखे दिवाणी कायदे नाहींत. वेगवेगळ्या धर्मांच्या व शास्त्रांच्या जुन्या नीतिनियमांच्या आधारें सध्यांचे हिंदुस्थानांतील निरनिराळे दिवाणी कायदे आहेत. आंतरजातीय विवाह १९३३ च्या स्पेशल मॅरेज ॲक्टनंतर सुलभ होऊं लागले. परंतु संतति व मातापितरें यांना नागरिकत्वाचे हक्क मिळण्यासाठीं लग्नें सक्तीनें राजिस्टर करण्याचें तत्त्व अमलांत न आणल्यामुळें तो कायदा अपूर्णच राहिला आहे.

हिंदु व मुसलमान समाजांत स्त्रिया बहुशः लग्न करणेंच पसंत करितात. अविवाहित स्त्रिया या दोन्ही समाजांत क्वचितच दिसून येतात. हिंदु—विवाह कायदा मनुस्मृतीवर आधारलेला आहे. या कायद्यान्वयें हिंदु लग्नाला घटस्फोट मान्य नाहीं. हल्लीं हिंदु समाजांतर्गत आंतर्जातीय विवाह १९२३ च्या कायद्याप्रमाणें होऊं शकतात. हिंदु विवाह हा एक धर्मविधि मानला जातो तर मुसलमानांत विवाह हा एक करार आहे. त्यामुळें मुसलमान विवाह घटस्फोट मान्य करतो व घटस्फोट करावा लागला तर पतीनें पत्नीला द्यावयाची रक्कम अगोदरच लग्नाचे वेळीं नक्की करण्यांत येत असते. दोघांच्याही संमतीनें आणि अदालतीच्या कायद्याप्रमाणें घटस्फोट मिळाला पाहिजे असा मुसलमानी शास्त्राचा आदेश आहे. तरीसुद्धां पतीला कारण न दाखवितां देखील " तलाक़ " ( घटस्फोट ) करण्याचा अधिकार आहेच. हा स्त्रीला अन्याय आहे. १९३९ त या कायद्यांत होऊन स्त्रियांना पतीकडून बेपर्वाई, छळ, सात किंवा अधिक वर्षांचा तुरुंगवास इत्यादि कारणें असल्यास घटस्फोट मागण्याची सवलत देण्यांत आली. पण हिंदु स्त्री धर्मांतर करून घटस्फोट घेऊं शकते तशी मुसलमान स्त्री घेऊं शकत नाहीं.

पारशी लोकांत १८६५ नंतर विवाहविषयक व्यवस्थित कायदे अस्तित्वांत आले. पूर्वीं हिंदु समाजांतच राहात असल्यामुळें त्यांच्याच चालीरीति पारश्यांनीं स्वतःस लावून घेतल्या. १८६५ त मात्र त्यांनीं लग्न व घटस्फोटविषयक कायदा पास करून घेतला. बहुपत्नीकत्व रद्द करून घेतलें. दोन्ही पक्षीं व्यभिचार केल्यास किंवा नवऱ्यानें छळ किंवा दोन अथवा अधिक वर्षें पत्नीस टाकून दिलें तर घटस्फोट होऊं शकतो. घटस्फोटानंतर निर्दोष पक्षाकडे मुलांचें पालकत्व जातें. बापानें त्यांचा खर्च केला पाहिजे असा कायदा आहे. एखादा पक्ष वेडा असेल किंवा पति तृतीयपुरुषी असेल तरही घटस्फोट होऊं शकतो.

हिंदी ख्रिस्ती स्त्रियांसही घटस्फोट कायद्यानें मिळतो. इंग्लंडांतील घटस्फोटाच्या कायद्याप्रमाणेंच इकडीलही कायदा आहे. द्विभार्यत्व, बला-

ल्कार, विकृतगमन, पशुतुल्य वृत्ति इत्यादि कारणें पुरेशीं आहेत. मात्र नुसत्या व्यभिचारावरसुद्धां इंग्लंडांत स्त्रीला घटस्फोट मागता येतो, तसा तो येथें मागतां येत नाहीं. घटस्फोटानंतर मुलगी ही आईची कायदेशीर वारस ठरूं शकते.

हिंदु स्त्रियांना मात्र कसलीच सवलत नाहीं. आशियाखंडांतील त्यांच्या इतर देशीय भगिनींच्या बाबतींत त्यांच्या त्यांच्या कायद्यांनीं खूप सवलती दिल्या आहेत. चिनी लोकांत सात कारणांवरून घटस्फोट मांगतां येतो. जपानमध्येंही पूर्ण मोकळीक आहे. ब्रह्मदेशांत लग्न हा करार मानला जातो. तेथेंही घटस्फोटास पुष्कळ सवलती आहेत व स्त्रियांस खूप स्वातंत्र्य आहे. ज्यू लोकांतही व्यभिचार सोडून इतर अनेक कारणांस्तव घटस्फोट मागतां येतो. हिंदु स्त्रियांना पतीनें टाकून दिलें, छळलें, दुसरें लग्न केलें, तो तृतीयपुरुषी असला किंवा महारोगी असला तरीसुद्धां घटस्फोट मागतां येत नाहीं.

बडोदें संस्थानांत मात्र कांहीं वर्षांपूर्वीं हिंदु स्त्रियांना घटस्फोट घेण्याची मोकळीक देणारा कायदा पास करण्यांत आला. निरनिराळ्या सात कारणांवरून उभय पक्षांस घटस्फोट मागण्याचा हक्क पोंचतो. हिंदु समाजांत खालच्या जातींत काडीमोडाची चाल रूढ आहे, पण पांढरपेशा विशेषतः ब्राह्मणवर्गांत तशी चाल नसल्यामुळें इतर जातीही घटस्फोटाकडे तिरस्काराच्या दृष्टीनें पाहूं लागल्या. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत व पराशरस्मृतींत पुनर्लग्नाचा उल्लेख सांपडतो व पुनर्लग्नाच्या कांहीं अटी तर पहिल्या पतीच्या हयातींतील आहेत. त्यामुळें एके काळीं देशांत विवाहविच्छेद रूढ होता. नंतर तो बंद झाला.

वारसा हक्काच्या बाबतींतही हिंदु स्त्रियांची फार कुचंबणा आहे. कौमार्यांत बाप, तरुणपणीं पति व पतीच्या पश्चात् पुत्र यांच्यावरच स्त्री आश्रित असली पाहिजे, या स्मृतिवचनास अनुसरून स्त्रियांस आर्थिक स्वातंत्र्य मिळूंच शकलें नाहीं. हिंदूंत अविभक्त कुटुंबपद्धति असल्यामुळेंही स्त्रीला आपल्या बापाच्या वा पतीच्या दौलतीवर हक्क सांगतां येत नाहीं. तिला

६४९५८

फक्त पोटगी, निवास व लग्नखर्च एवढ्यांवरच हक्क सांगतां येतो. पतीला पुत्र किंवा नजीकचे वारस नसल्यामुळें विधवेच्या ताब्यांत कांहीं काळ दौलत आली तरी तिला तिची स्वेच्छेनें विल्हेवाट लावण्याचा अधिकार नसतो. ती नुसती विश्वस्त म्हणूनच दौलतीचा कारभार पहात असते. तिच्यामागून दौलत पतीच्या दूरच्या नातलगांस जाईल. प्राचीन " मिताक्षरा " या कायदेग्रंथाच्या आधारें हिंदु वारसा कायदा अस्तित्वांत आला आहे. अर्वाचीन परिस्थितीप्रमाणें या कायद्यांत फेरफार करणें आवश्यक आहे. सरकार आपल्या मर्जीप्रमाणें कधीं कधीं हिंदी जुन्या कायद्यांत फरक करतेंच. कारण हिंदुस्थानांतील जुने फौजदारी कायदे बाजूस ठेवून सरकारनें पीनल कोड म्हणून नवीन कायदेग्रंथ निर्माण केला आहेच. सतीप्रतिबंधक कायदा, संमतिवयाचा कायदा, पुनर्विवाहाचा कायदा, सारडा कायदा व देशमुखांचा वारसा कायदा असले कायदेही सरकारनें पास करून घेतले आहेत. परंतु जेथें जेथें सरकारच्या दृष्टीनें राजकीय वा आर्थिक महत्त्वाची बाब नसेल ( कीं जिच्यामुळें सरकारच्या तंत्राला कोठें तरी स्पर्श होत आहे असें सरकारला वाटलें पाहिजे ) तर इतर सामाजिक, धार्मिक वा शैक्षणिक बाबतींत सरकार आपल्या तटस्थपणाचें स्तोम माजवून प्रगतिपथांत उदासीन राहातें. पुष्कळ वर्षें कायदेमंडळेंसुद्धां प्रातिनिधिक स्वरूपाचीं नव्हतीं. समाजांत शिक्षणप्रचार नाहीं; खरोखरीच्या प्रगमनशील, क्रांतिकारक विचारांच्या लोकनायकांबद्दल सरकारच्या मनांत अविश्वास व धाकधूक; सनातनी, संकुचित मतांचें आणि वैयक्तिक स्वार्थांच्याच दृष्टीनें विचार करणारे लोक कायदेमंडळावर नेमण्याची सरकारची वृत्ति; मताधिकाराचें क्षेत्र न वाढविण्याकडे असलेला सरकारचा कल; त्यामुळें बहुजनसमाजांत आपलीं मतें व तळमळ हीं प्रकट करण्यास मिळणाऱ्या संधीचा अभाव; हीं सर्व कारणें विचारांत घेतल्यास हिंदुसमाज अजूनही मागासलेला कां राहिला आहे त्याची कल्पना येईल. हिंदूंच्या मानानें मुसलमान, पारशी व ख्रिस्ती समाजांत स्त्रियांना आर्थिक क्षेत्रांत सवलती जास्त आहेत. फक्त मलबार, त्रावणकोर व

कोचीन या प्रदेशांत मातृसत्ताक पद्धति चालू असल्यामुळें तेथील स्त्रियांना वारसाहक्क पुरुषांप्रमाणेंच आहेत. लग्न व घटस्फोट यांतही पुरुषांइतकीच मोकळीक आहे. पण तेथील पत्नीला व मुलांना आपल्या पतीच्या किंवा बापाच्या स्वकष्टार्जित दौलतीवर वारसा सांगतां येत नव्हता तो पुढें नवीन कायद्यान्वयें सांगतां येऊं लागला.

स्त्रियांना मताधिकाराचें क्षेत्र मात्र हिंदुस्थानांत सुलभतेनें मोकळें झालें. खरें सांगावयाचें म्हणजे इंग्लंडमधील स्त्रियांस यानिमित्त ज्या चळवळी कराव्या लागल्या व जे क्लेश सहन करावे लागले त्यांचा मागमूसही हिंदी स्त्रियांच्या बाबतींत दिसून आला नाहीं. स्त्रीशिक्षणाचा प्रचार होऊन अर्धशतक लोटल्यावर स्त्रियांस मताधिकार प्राप्त करून घेण्याची इच्छा वाटूं लागली. १९१९ त भारतमंत्री मि. मॅंटेग्यू हे हिंदुस्थानांत आले असतां हिंदी स्त्रियांच्या शिष्टमंडळानें त्यांची भेट घेऊन स्त्रियांस मताधिकार मिळावा अशी मागणी केली. पण ब्रिटिश पार्लमेंट स्वतःच्या देशांतील स्त्रियांकडेसुद्धां उदारबुद्धीनें वागत नव्हतें तें हिंदी स्त्रियांची मागणी कां स्वीकारील ? परंतु पार्लमेंटनें याचा निर्णय ठिकठिकाणच्या प्रांतिय कायदेमंडळांनीं द्यावा असें कळविलें. त्यामुळें हिंदी स्त्रियांचा फायदा झाला. कारण हिंदी जागृत लोकमत सारें त्यांना अनुकूल होतें व हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी प्रातिनिधिक स्वरूपाची लोकसंस्था जी हिंदी राष्ट्रीय सभा तिनें स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें दर्जा देऊन टाकला होता. कॉंग्रेसच्या घटनेंत स्त्रिया मतदार, प्रतिनिधि, पदाधिकारी व अध्यक्षही होऊं शकतात हें त्या संस्थेनें जगास दाखवून दिलें होतें. हिंदी सोशल कॉन्फरन्सनेंही स्त्रियांना सर्व क्षेत्रें मोकळीं असावीं असें जाहीर केलें होतें. त्यामुळें सर्व प्रांतीय कायदेमंडळांनीं स्त्रियांस मतदानाचे अधिकार देऊन टाकले, इतकेंच नव्हे तर उमेदवारी करण्याचा सुद्धां हक्क दिला. कायदेमंडळांत जागा दिल्या व शेवटीं मंत्रिपदावरही स्त्रीची स्थापना केली.

याप्रमाणें आपण हिंदुस्थानांतील स्त्रीजीवनाचा संक्षेपांत आढावा

घेतला. आजच्या परिस्थितीविरुद्ध पुरुषांप्रमाणें स्त्रियांचीहि ओरड आहे. समाजांतील हलाखी पुरुषांपेक्षां स्त्रियांना अधिक भोंवत आहे हें आंकड्यांनीं सिद्ध झालेलें आपण पाहिलें. स्त्रियांचें आयुष्य क्षीण होत जात आहे. त्यांचें आरोग्य निकृष्ट अवस्थेला पोंचलें आहे, आर्थिक दृष्ट्या त्या परावलंबी आहेत, सामाजिक जीवनांतील विषमता: व राजकीय जीवनांतील गुलामी त्यांना अधिकाधिक जाचक होत आहेत. शिक्षणाचे संस्कार त्यांपैकीं फारच अल्प संख्येस मिळतात हें सर्व आपण पाहून चुकलों. या सर्व परिस्थितींतून त्यांची मुक्तता करण्यासाठीं पूर्वीपासून पुरुष झटत आले. बंगालमध्यें राजा राममोहन राय यांनीं सतीची चाल बंद करविण्यांत आणि विधवांचे पुनर्विवाह सुरू करावे हें मत प्रसृत करण्यांत खूप मेहेनत घेतली. पुढें पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या चळवळीमुळें विधवा-पुनर्विवाहाचा कायदा १८५६ त पसार झाला. पंडितजींनीं हिंदु समाजांतील सामाजिक कुप्रथा नाहींशा करण्यासाठीं आमरण परिश्रम केले. स्त्रीशिक्षणाच्या आद्यप्रवर्तकांपैकीं ते एक होते. नंतर मलबारीशेठ, श्री. माधवराव रानडे, सर नारायणराव चंदावरकर, श्री. नटराजन्, प्रो. कर्वे, दिवाणबहादूर हरविलास सारडा या सर्व प्रातःस्मरणीय सज्जनांनीं महिलोद्धाराचें पवित्र कार्य अव्याहत पुढें चालविलें.

परंतु केवळ पुरुषांनीं प्रयत्न केल्यानें हें कार्य उत्कर्षास पोंचलें नसतें. उद्धाराची खरी किल्ली आत्म्याकडे असते. म्हणजे आपला उद्धार ज्याचा त्यानें करून घ्यावयाचा असतो. खुद्द स्त्रीसमाजानेंच हातपाय हालविले नसते तर कार्य पुढें रेटलें नसतें. श्री. रमाबाई रानडे यांनीं या क्षेत्रांत फार मोठी कामगिरी केली. त्यांच्या सेवासदन संस्थेनें शेंकडों स्त्रियांस शक्तिशाली बनविलें. लेडी बोस, श्रीमती पी. के. राय, डॉ. श्रीमती मुथुलक्ष्मी रेड्डी, भोपाळच्या सुलतानजहान नवाबबेगम, बी अम्मा, बडोद्याच्या महाराणी श्री. चिमणाबाई गायकवाड इत्यादि महिलांनीं स्त्रियांची प्रगति घडवून आणण्यासाठीं स्त्रीसमाजाची बहुमोल सेवा केली आहे.

आज हिंदुस्थानांत जागृत व प्रबुद्ध महिला स्त्रीजीवनाचा अभ्यास करून त्याची चर्चा अनेक व्यासपीठांवरून त्याचप्रमाणें ग्रंथांतून, नियतकालिकांतून व संभाषणचर्चांतूनही करीत असतात. स्त्रियांपुढील अवघड प्रश्नांवर पुष्कळांनीं आपापल्यापरी अनेक उपाय सुचविले आहेत. जरी हिंदी स्त्रिया पाश्चात्य स्त्रियांप्रमाणें पुरुषांशीं जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत स्पर्धा करूं इच्छीत नाहींत तरीसुद्धां हिंदी सुशिक्षित महिलांवर पाश्चात्य विचारसरणीचा थोडाफार परिणाम झाल्याविना राहात नाहीं. विशेषतः पुढारलेल्या सुशिक्षित स्त्रियांच्या विचारांतून महिलोद्धारांच्या कल्पनेंत पुरुषांचें व स्त्रियांचें शिक्षण एकच असावें, सरकारी नोकऱ्यांचीं सर्व क्षेत्रें त्यांना पुरुषांप्रमाणेंच मोकळीं असावीं, विवाह व विवाहविच्छेद या संस्था ऐच्छिक असाव्या, संततिनियमन कायदेशीर व मोफत आणि सर्रास असावें असा सूर वहात असलेला दिसून येतो. महिलांच्या उद्धाराची कल्पना अमलांत आणण्यापूर्वी त्यांची समाजांत भूमिका काय असावी याची स्पष्ट कल्पना प्रथम असली पाहिजे. केवळ मूठभर सुशिक्षित स्त्रियांच्या दृष्टीनें हा प्रश्न हाताळला जाणें शक्य नाहीं. महात्माजींनीं एकदां एका भगिनींच्या सभेंत उद्गार काढले होते. " स्त्रियांच्या उद्धाराविषयीं आपण बोलतों तेव्हां आपला अर्थ स्पष्ट झाला पाहिजे. उद्धाराच्या मागें अवनतीची कल्पना आहे. जर स्त्रिया आज अवनत आहेत तर त्या अवनत कशामुळें व कां झाल्या त्याचाही विचार केला पाहिजे. हिंदुस्थानभर मीं प्रवास करतांना मला आढळून आलें कीं ही सारी चळवळ समाजाच्या एका अणुएवढ्या भागांत चालली आहे. कोट्यवधि स्त्रीपुरुषाना या चळवळीबद्दल कांहींच माहिती नाहीं. या देशांतील ८५ टक्के लोक आपल्या भोंवतीं काय चाललें आहे त्याची बिलकूल फिकीर न करतां अज्ञानांत दिवस घालवीत असतात. पण ते अज्ञान असले तरी आपलें कर्तव्य नीटपणें पार पाडीत असतात, मग तें अल्प कां असेना ! स्त्रिया व पुरुष दोघांनाही शिक्षण मिळालेलें नसतें. दोघेही परस्परांस करावी तितकी मदत करीत असतात. जर त्यांचें जीवन कोठल्याही अर्थानें अपूर्ण असेल

तर त्याचें कारण बाकीच्या पंधरा टक्के लोकांच्या जीवनांतील अपूर्णता हेंच आहे. माझ्या भगिनींनीं पुढें येऊन या ८५ टक्के लोकांच्या जीवनाचा जवळून अभ्यास करावा. ''

स्त्री जर कर्तृत्वानें पुरुषांच्या बरोबरीचीच आहे तर पुरुष तिला दाबूं कसा शकतो, चढवूं कसा शकतो आणि एकवार स्वातंत्र्य आणि समता उपभोगणाऱ्या स्त्रियांना पुन्हां आपल्या गुलाम कसें बनवूं शकतो ? स्वतंत्र प्रजा परतंत्र कां होतात ? कारण स्वतंत्र प्रजा आपल्या राष्ट्रधर्मापासून च्युत झाल्या कीं त्यांचा विनाशकाल सुरू होतो. तद्वतच स्त्रियांनीं आपला धर्म सोडला म्हणून त्यांचा पराक्रम निस्तेज पडला, त्यांना पंगुत्व आलें. परंतु पुरुषांच्या बरोबरीनें सर्व क्षेत्रांत प्रवेश करून, स्त्रिया आपला पराक्रम दाखविणार कीं निसर्गानेंच त्यांना दिलेल्या भूमिकेवर स्थिर राहाणार हा प्रश्न आहे. स्त्री ही निसर्गत: माता आहे व ती हा आपला ' स्वधर्म ' कधींच सोडणार नाहीं हेंही तितकेंच खरें आहे. मोठ्याच नव्हे तर सर्वच संख्येनें स्त्रिया विवाहित होणार आणि मुलांबाळांची जोपासना करणार हेंही निश्चित आहे. यामुळेंच हिंदुस्थानांत गेल्या ४०।५० वर्षांत शेंकडों स्त्रिया उच्च शिक्षण घेऊन तयार झाल्या तरी बहुतेकजणी घर सांभाळण्यांतच गर्क होऊन गेल्या. आपलें घरकूल व मुलें सोडण्यास कोणत्याही स्त्रीस स्वभावत: आवडत नाहीं. या स्त्रीच्या प्रकृतीचा अभ्यास करूनच प्राचीन समाजशास्त्रवेत्त्यांनीं " उत्पादनमपत्य जातस्य परिपालनम् । '' हें स्त्रियांचें कर्तव्य ठरविलें असावें. ज्या स्त्रियांत असाधारण कर्तृत्व आहे त्यांना घराच्या चार भिंती जाचक होतात; त्यांना बाहेर समाजांत येऊन आपली शक्ति प्रकट करण्याची तळमळ वाटत असते, त्यामुळें समाजाची घरबैठी संस्कृति तिला जाचक वाटते व ती तिच्याविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त होते. परंतु स्त्री जर योग्य मार्गानें आपला विकास करून घेईल व योग्य तपस्या करील तर समाज तिला प्रोत्साहनच देईल, तिचें कौतुक करील, तिला सर्वतोपरि मदत करील अशाही उदाहरणें आहेत. म्हणून बदललेल्या परिस्थितीस अनुरूप असे कायदे करून

घेण्यासाठीं प्राचीन संस्कृतींतील चांगल्या गोष्टींचाही नाश करावा कीं प्राचीन अर्वाचीन दोहोंचाही अभ्यास करून दोहींतील शुभ गोष्टींचा स्वीकार करावा हा स्त्रियांनींच विचार करून सोडविण्यासारखा प्रश्न आहे.

अर्वाचीन परिस्थिति ही स्वतंत्रपणें विकास पावलेली परिस्थिति नाहीं, उलट ती विकृत परिस्थिति आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आदर्श परिस्थिति कशी असली पाहिजे याचें चित्र स्त्रीसमाजासमोर स्वच्छ रंगविलें गेलें पाहिजे. महात्माजी म्हणतात " स्त्रीला घर सोडून घराच्या रक्षणासाठीं खांद्यावर बंदूक टाकणें भाग पडेल तर ती गोष्ट उभयतां स्त्रीपुरुषांना लाजिरवाणी आहे. मग अतिप्राचीन रानटी परिस्थितीप्रत आपण पोंचलों असेंच समजावें. "

मुख्य अडचण ही आहे कीं देशभर सर्व स्त्रिया घर सांभाळून आहेत परंतु घरसंस्थेचा प्रभाव समाजसंस्थेवर पडला पाहिजे आणि समाजाचा विकास गृहकृत्यें सांभाळीत असतांना स्त्रियांनींच घडवून आणला पाहिजे, ही मुद्याची गोष्ट स्त्रिया विसरून गेल्या आहेत. जर कन्या, पत्नी, माता, गृहिणी या नात्यानें आपल्या शक्तीची व जबाबदारीची जाणीव त्या ठेवतील तर त्या बालविवाह, विषम विवाह, अज्ञान अडाणी समजुती, वाईट चाली समाजांत राहूं देणार नाहींत; पुरुषांना स्त्रीवर अत्याचार करणें, तिचा त्याग करणें, द्वितीय संबंध, व्याभिचार किंवा वेश्यागमन करणें या गोष्टी अशक्य करून टाकतील; अनाथ व दुर्बळ स्त्रियांचें रक्षण करतील; स्त्रियांत शिक्षणाचा प्रचार करतील. जागृत स्त्रीशक्ति काय करणार नाहीं ? तिनें योग्य संघटना केल्यास सरकारच्या मदतीशिवाय आणि पुरुषांशीं स्पर्धा केल्याशिवाय बहुतेक सामाजिक प्रश्न ती सोडवूं शकेल. " पाहिली गोष्ट म्हणजे स्त्रीला तिच्या मानसिक गुलामीपासून मुक्त केलें पाहिजे; तिच्या शरीराच्या पावित्र्याची जाणीव तिला दिली पाहिजे आणि राष्ट्राची व मानवतेची सेवा करण्यांत केवढा गौरव आहे हें तिला शिकविलें पाहिजे, " हें महात्माजींचें वाक्य सोन्याच्या अक्षरांनीं लिहिण्यासारखें आहे.

त्यामुळें सरकारी शिक्षणाचा प्रचार हिंदी स्त्रियांत होत नाहीं याचें आश्चर्य वाटावयास नको. जें शिक्षण मुर्दाड आहे, ज्यांत जिवंतपणाच नाहीं, तें हिंदुस्थानांतील लाखों स्त्रियांना रुचावें कसें व पचावें कसें ? थोडेंफार शिक्षण घेतलेल्या स्त्रियाही थोड्याच कालांत तें विसरून जातात त्याचें कारण हेंच आहे. तें जीवनस्पर्शी शिक्षण नाहीं. आणि म्हणूनच तें शिक्षण घेतलेल्या भगिनींतून समाजसेवा करण्यासाठीं सेविका मोठ्या प्रमाणांत निर्माण होत नाहींत याचेंही कारण तेंच आहे. आमच्या शिक्षणपद्धतींत क्रांति झाली पाहिजे व स्त्रीजीवनाचा नीट अभ्यास करून भावी भूमिका लक्षांत घेऊन त्याच्या जीवनविकासास मदत करणारें शिक्षणच त्यांना देण्यांत आलें पाहिजे. हल्लीं प्रचारांत असलेल्या बाल-विवाह, विषमविवाहांसारख्या कुप्रथा नाहींशा होतील तर पुष्कळसे सामाजिक दुष्परिणाम आपोआपच नाहींसे होतील. सामाजिक बाबतींत कायद्यांची मदत कोठवर घ्यावी हाही एक सवाल आहेच. परंतु दारू-बंदी व मंदिर–प्रवेश ( अस्पृश्यांचा ) यांसाठीं जर कायद्याची मदत घेतां येते तर याही बाबतींत घेण्यास हरकत नाहीं. तेंवढ्यानें बाल-विधवांचा आणि बालमातांचा तसेंच बालमृत्यूचा घोर प्रश्न बराचसा अदृश्य होईल. संततिनियमनाचा प्रश्न या छोट्या पुस्तिकेंत चर्चेसाठीं घेतला नाहीं. कारण त्या प्रश्नावर दुमत आहे. बालविवाह व विषम-विवाहाचें उच्चाटण केल्यानें संततीचा प्रश्न मिटेलच असें नाहीं. परंतु त्या गोष्टीलाही दुसरी बाजू आहे. हिंदुस्थानांत लोकसंख्या वाढत आहे पण ती सुद्धां वाढावी तीपेक्षां कमीच वाढते व मृत्युसंख्या जास्त आहे असाही एक तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. उलट दुर्बल संतति काय कामाची ? तिला पोसण्याची ताकद आईबापांत नसतांना देशाच्या दिवाळखोर परिस्थितींत हें ओझें कशाला ? असेंही कांहीं म्हणतात. इतक्या विद्वान् स्त्रीपुरुषांनीं यावर अनुकूल मतें दिलीं आहेत कीं, त्यावर ध्येयवादी मत देणें साहसाचेंच वाटेल. तरीसुद्धां हें साहस करावेंच लागेल. स्त्रीला निसर्गानें पुरुषाशीं सर्व वेळीं सर्व काळीं बांधून ठेवलें नाहीं, तीं त्याची विलास-

दासीही नव्हे. आजच्या परिस्थितींत कुटुंबव्यवस्था, लग्नसंबंध व यंत्र-संस्कृति हीं सर्व स्त्रीपुरुषांचे लैंगिक संबंध व विकार उत्तेजित करण्यांतच मदत करितात व त्यांतून हे अनर्थ निर्माण होत आहेत; हिंदी स्त्रीपुरुषांना आपल्या वीर्यशक्तीचा उपयोग करण्यास अन्य क्षेत्रें नाहींत व त्यामुळें सारी शक्ति संततीचें उत्पादन करण्याकडेच खर्च होत आहे व तींतून सर्वनाश घडून येत आहे. या गोष्टीस आळा घालण्यासाठीं सर्व शास्त्रज्ञांनीं व समाजशास्त्रवेत्त्यांनीं संशोधन करावें. आदर्श संतति निर्माण करण्यासाठीं आदर्श समाजरचना अत्यंत आवश्यक आहे. या क्षेत्रांतही स्त्रियांनींच पुढाकार घेतला पाहिजे.

परंतु आजच्या काळांत स्त्रियांवर फार मोठी जबाबदारी असेल तर आपला देश स्वतंत्र करण्याचीच होय. आपल्या जीवनाच्या भाग्यविधात्या आपणांसच बनावयाचें असेल तर देश स्वतंत्र झाल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. आमच्या आर्थिक व सामाजिक अडचणीसुद्धां पारतंत्र्यांतून उद्भवल्या आहेत हें सिद्धच आहे. पुरुषांच्या बरोबरीनें शक्ति अजमावण्याची संधि-सुद्धां याच क्षेत्रांत स्त्रियांस मिळाली व राजकारणानेंच स्त्रियांत आत्म-विश्वास निर्माण केला. हें शक्तीचें दर्शनस्थान स्त्रियांनीं कधींही विसरूं नये.

REFBK-0006617

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

संपादक :
त्र्यं. र. देवगिरीकर

( सर्व हक्क महाराष्ट्र काँग्रेसप्रकाशन मंडळाचे स्वाधीन. )

मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक),
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें.